**<u>ठळक बातम्या</u>**

- मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सात आरोपींची ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता

- निसार उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल संसदेच्या दोन्ही सभागृहात इस्रोचं अभिनंदन

- बिहार मतदार याद्यांचा मसुदा निवडणूक आयोग उद्या प्रसिद्ध करणार

- भारत - इंग्लंड दरम्यान अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आजपासून ओव्हल मैदानावर

**आणि**

- राष्ट्रसेविका समितीच्या माजी प्रमुख संचालक प्रमिलाताई मेढे यांचं निधन

**<><><><>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व सात आरोपींची आज विशेष एनआयए न्यायालयाने ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. सुमारे १७ वर्षे चाललेल्या या प्रदीर्घ खटल्यानंतर न्यायालयाने हा आदेश दिला. आरोपींमध्ये माजी भाजप खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा समावेश आहे. सरकारी वकिलांनी कोणताही ठोस पुरावा सादर न केल्यामुळे सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करत असल्याचं विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आपल्या निकालात नमूद केलं. २००८मध्ये महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यामध्ये मालेगाव इथं हा बॉम्बस्फोट झाला होता. त्यात सहा जणांचा मृत्यू झाला तर १००हून अधिक जण जखमी झाले होते. या प्रकरणाचा सुरुवातीचा तपास एटीएस अर्थात दहशतवाद विरोधी पथकानं केला होता. या प्रकरणी १२ जणांना अटक झाली होती. त्यानंतर हा तपास एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आला होता. या प्रकरणातला अंतिम युक्तिवाद एप्रिल २०२४ मध्ये संपला आणि न्यायालयानं १९ एप्रिल रोजी या खटल्याचा निकाल राखून ठेवला होता.

खटल्यातल्या १२ आरोपींपैकी ३ जणांची यापूर्वीच निर्दोष सुटका झाली होती. तर दोन आरोपींवर फक्त शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत खटला चालवला जाईल, असं न्यायालयानं

आज स्पष्ट केलं. या निकालावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. दहशतवाद कधीच भगवा नव्हता आणि नसेल, असं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोनं निसार या कृत्रिम अपर्चर रडार उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण केल्याबद्दल आज संसदेच्या दोन्ही सभागृहात इस्रोच्या वैज्ञानिकांचं अभिनंदन करण्यात आलं. या उपग्रहाचं काल श्रीहरिकोटा इथल्या अवकाश केंद्रावरुन यशस्वी प्रक्षेपण झालं. इस्रो आणि नासाच्या सहकार्यातून यशस्वी झालेला हा प्रकल्प भारताची अंतराळक्षेत्रातली वाढती क्षमता अधोरेखित करतो असं उपाध्यक्ष हरिवंश म्हणाले.

लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी इसरोच्या वैज्ञानिकांचं अभिनंदन करुन त्यांना भविष्यातल्या कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

सभापती ओम बिरला यांनी नंतर प्रश्नोत्तराचा तास पुकारण्याचा प्रयत्न केला. मात्र बिहारमधलं मतदार याद्यांचं पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधकांनी गदारोळ केला. सभापतींनी सदस्यांना शांत राहण्याचं आवाहन केलं मात्र घोषणा थांबल्या नाहीत त्यामुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित केलं.

राज्यसभेतही गदारोळामुळे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित केलं होतं.

**<><><>**

उद्यापासून भारतीय उत्पादनांवर २५ टक्के कर लागू करण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेची भारतानं गंभीर दखल घेतली आहे. राष्ट्रहिताच्या सुरक्षेसाठी सरकार आवश्यक त्या सर्व उपाययोजना सरकार करेल असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. भारत आणि अमेरिकेदरम्यान निष्पक्ष, संतुलित आणि परस्परहिताच्या द्विपक्षीय व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरू आहेत. मात्र सरकारनं सर्वोच्च प्राधान्य शेतकरी, उद्योजक तसंच सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांच्या हिताला चालना देणं आणि त्यांच्या हिताचं रक्षण करणं याला दिल्याचं या निवेदनात म्हटलं आहे. दरम्यान, अमेरिकेच्या या निर्णयाबाबत फिक्की या औद्योगिक संघटनेनं नाराजी व्यक्त केली आहे. या निर्णयाचा देशाच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो अशी प्रतिक्रिया फिक्कीचे अध्यक्ष हर्षवर्धन अगरवाल यांनी व्यक्त केली आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३१ जुलै २०२५ - गुरुवार

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज शहीद उधम सिंग यांना त्यांच्या शहीद दिनानिमित्त आदरांजली वाहिली आहे. शहीद उधम सिंग भारताचे अमर सुपुत्र होते. त्यांची देशभक्ती आणि शौर्य देशवासियांसाठी नेहमीच प्रेरणादायी असेल, असं प्रधानमंत्री आपल्या समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.

<><><><>

बिहार मतदार याद्यांचा मसुदा निवडणूक आयोग उद्या प्रसिद्ध करणार आहे. मृत व्यक्तीचं नाव यादीत असेल किंवा एका व्यक्तीचं नाव एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदवलेलं असेल तर त्यात दुरुस्ती करणं हा याचा हेतू आहे. मतदार याद्यांचा हा मसुदा तात्पुरता असेल, यावर आक्षेप नोंदवल्यावर यात दुरुस्ती केली जाईल असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. बिहारमधे मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण केल्यावर यात २२ लाख मतदार मृत असल्याचं आढळून आलं, ७ लाख बनावट मतदार तर ३५ लाख स्थलांतरित मतदार आढळले. या सर्वांची नावं मतदार यादीतून काढून टाकण्यात आली आहेत. उद्या यादी प्रसिद्ध झाल्यानंतर २ ऑगस्ट ते १ सप्टेंबर पर्यंत नागरिकांना आक्षेप नोंदवता येईल.

<><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यात अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आज लंडनच्या केनिंग्टन ओव्हल मैदानावर सुरु होत आहे. मालिकेतला चौथा सामना अनिर्णित राहिल्यामुळं सध्या इंग्लडकडे २-१ अशी आघाडी आहे. अंतिम सामन्यात विजय मिळवून  मालिकेत बरोबरी साधण्याची संधी भारताला आहे. गेल्या चार सामन्यात एकदाही नाणेफेकीचा कौल भारतीय कर्णधार शुभमन गिलच्या बाजूनं लागला नाही. या सामन्यात यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंतला विश्रांती देण्यात आली आहे.

सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार साडेतीन वाजता सुरु होईल.

<><><><>

राष्ट्रसेविका समितीच्या माजी प्रमुख संचालक प्रमिलाताई मेढे यांचं आज नागपुरात वार्धाक्यानं निधन झालं. त्या ९७ वर्षांच्या होत्या. त्यांचं पार्थिव नागपूरच्या देवी अहल्या मंदिरात अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आलं आहे. प्रमिलाताईंच्या इच्छेनुसार त्यांचा देह एम्स रुग्णालयाला दान करण्यात येणार आहे.

राष्ट्र सेविका समितीच्या माध्यमातून त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी भरीव कार्य केलं. १९७८ पासून कार्यवाहिका म्हणून तर २००३ ते २००६ या काळात प्रमुख संचालक पद त्यांनी भूषवलं. त्यांना नागपूर विद्यापीठाने डी लिट ने सन्मानित केलं होतं.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रमिलाताईंच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. स्वयंसेवकांनी मातृतुल्य व्यक्तिमत्व गमावलं असल्याचं त्यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

भारतभर फिरुन राष्ट्र सेविका समितीचं कार्य देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी प्रमिलाताई मेढे यांनी केलेल्या प्रयत्नांचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात केला असून आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

टपाल विभागातर्फे माहिती तंत्रज्ञानाच्या वापरासाठी ए पी टी अप्लीकेशन ही डिजिटल प्रणाली टपाल कार्यालयांमधे लागू होणार आहे. यामुळे टपाल विभागाचे सर्व व्यवहार अधिक जलद, अचूक आणि ग्राहकाभिमुख होणार आहेत. देशातल्या विविध टपाल कार्यालयांमधे त्याकरता डेटा ट्रान्सफर म्हणजेच विदा स्थलांतराचं काम टप्प्याटप्प्यानं सुरू आहे.

<><><><>

दिल्ली विकास प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्याला लाच घेतल्याच्या आरोपावरून सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागाने अटक केली आहे. या अधिकाऱ्याने तक्रारदाराकडून त्याच्या दुकानाच्या फ्रीहोल्ड प्रक्रियेसाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यावरून सापळा लावत सीबीआयने या अधिकाऱ्याला २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडलं.

<><><><>

केरळच्या किनाऱ्यालगत यांत्रिक पद्धतीनं आणि  ट्रॉलर द्वारे करण्यात येणाऱ्या मासेमारीवरील प्रतिबंध आजपासून हटवण्यात आले आहेत. गेल्या ५२ दिवसांपासून ही मासेमारी बंद करण्यात आली होती. माशांच्या प्रजनन काळामुळे ही बंदी घालण्यात आली होती. आता मासेमारी नौका पुन्हा समुद्रात जाण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.

<><><><>

सीमाशुल्क विभागानं मुंबई विमानतळावर गेल्या दोन दिवसात सुमारे ८ कोटी रुपये किंमतीची ८ किलो अंमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणी दोन वेगवेगळ्या कारवाईत चौघांना अटक करण्यात आली आहे.

**//<><><><>//**